# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १५६ | किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१४७९ : हिंदीतील एक थोर कवी व श्रेष्ठ कृष्णभक्त कवी सुरदास यांचा जन्मदिन.

१७९० : विजेच्या शक्तीविषयी महत्वाचा शोध लावणारे अमेरिकेतील थोर शास्त्रज्ञ बेंडिमिन फ्रँकलिन यांचा मृत्यू.

१८९१ : नामवंत मराठी कोषकार यशवंत रामकृष्ण दाते यांचा जन्म.

| सेन्सेक्स | ७७,९८८.६८ | -१२२.५६ (०.१६%) |
|---|---|---|
| डॉलर | ₹ ९३.२७ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४१ | २४ |
| दिल्ली | ४० | २६ |
| मुंबई | ३५ | २४ |
| नागपूर | ४२ | २५ |
| पुणे | ३९ | १८ |

**सुविचार**

स्वतःचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करा. कठोर परिश्रमाशिवाय, स्वप्ने पूर्ण होणे अशक्य आहे.

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:०६ | संध्या-६:४७ |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५७,०५०/- | २,७०,०००/- |

# विरोध करणाऱ्यांना दीर्घकाळ किंमत चुकवावी लागेल!

## महिला आरक्षणावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांना थेट इशारा

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**महिला आरक्षणावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना धारेवर धरलं आहे. महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना याची किंमत प्रदीर्घकाळ चुकवावी लागेल, अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांना लक्ष्य केलं. महिलांच्या अधिकाऱ्यांना विरोध करणाऱ्यांना माफी मिळणार नाही, असंही मोदी यांनी लोकसभेत बोलताना सुनावलं. महिला आरक्षणावर लोकसभेत आज चर्चा होत आहे. याच विषयावर बोलताना पंतप्रधानांनी विरोधकांचा समाचार घेतला.**



कोणत्याही देशाच्या आयुष्यात असे काही निर्णायक क्षण येतात. त्यावेळी समाजाची मानसिकता आणि नेतृत्त्वाकडे असलेली त्या संधीचं सोनं करण्याची क्षमता देशाचं भविष्य बदलते. एका सशक्त देशाची निर्मिती करते. भारतीय लोकशाहीच्या इतिहासात हा क्षण तसाच आहे.

या महत्त्वाच्या आणि मोक्याच्या क्षणी खासदारांनी साथ द्यावी, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. आपण सगळे भारतीय एकत्रितपणे देशाला एक नवी दिशा देत आहोत, असं मोदींनी म्हटलं. आपण आपल्या शासन प्रणालीत अधिक संवेदनशीलता आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत. या मंथनातून जे अमृत निघेल ते केवळ देशाच्या राजकीय स्वरुपाला वेगळा आकार देणार नाही, तर देशाची दिशा ठरवेल, देशाची परिस्थिती बदलेल, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला.



**भारत लोकशाहीची जन्मभूमि आहे. विकासाच्या यात्रेला एक नवा आयाम देण्याची पवित्र संधी आपल्याला मिळाली आहे. देशाच्या निम्म्या लोकसंख्येला राष्ट्र निर्माणाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करण्याची संधी आपल्याला मिळाली, हे आपलं भाग्य आहे, असं मोदी म्हणाले.**

एका राष्ट्राच्या रुपात विचार करणं ही आपली जबाबदारी आहे. काश्मीर असो वा कन्याकुमारी असो, आपण ना तुकड्यांमध्ये विचार करु शकतो, ना निर्णय घेऊ शकतो. केवळ राजकीय लाभासाठी वादळ निर्माण केलं जात आहे. हा प्रकार चुकीचा आहे, असं मोदी म्हणाले.

कोणत्याही राज्याचं महत्त्व कमी होणार नाही, याची ग्वाही मोदींनी लोकसभेत दिली. लोकसभेतील कोणत्याही राज्याचं महत्त्व घटणार नाही. काही जण केवळ राजकीय स्वार्थासाठी वादळ निर्माण करत आहोत, अशा शब्दांत मोदींनी दक्षिणेकडील राज्यांना दिलासा दिला. जर गॅरेंटी शब्द हवा असेल तर मी त्या शब्दाचा वापर करतो. जर तुम्हाला आश्वासन (पान २ वर)

## भुसावळ नगराध्यक्षांची मंत्री संजय सावकारे यांच्या पत्नीविरोधात पोलीस अधीक्षकांकडे तक्रार

वृत्तसंस्था । जळगाव

**भुसावळ नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष गायत्री चेतन भंगाळे यांनी त्यांच्या विरोधात खोटे व बनावट कागदपत्र सादर करून जात पडताळणी प्रक्रियेत अडथळा निर्माण केल्याचा गंभीर आरोप करत राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्यापत्नी विरोधात पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणामुळे केवळ भुसावळच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.**



**गुन्हा दाखल करण्याची मागणी**

**याशिवाय, इतर व्यक्तींच्या मालमत्तेची कागदपत्रे स्वतःच्या नावाशी जोडून खोटा पुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोपही तक्रारीतून करण्यात आला आहे. या प्रकारामुळे केवळ त्यांच्या जात पडताळणी प्रक्रियेवर परिणाम होत नाही, तर संबंधित निष्पाप नागरिकांमध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता निर्माण होत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले आहे.**

गायत्री भंगाळे या सध्या भुसावळ नगरपालिकेत नगराध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या जात वैधतेसंदर्भातील दावा सध्या जळगाव येथील जात पडताळणी समितीसमोर सुनावणीसाठी प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर, नगराध्यक्ष निवडणुकीत त्यांच्याविरोधात उभ्या राहिलेल्या आणि पराभूत झालेल्या उमेदवार रजनी संजय सावकारे यांनी त्यांच्या जात दाव्याला आव्हान देण्यासाठी काही कागदपत्रे सादर केल्याचे समोर आले आहे.

नगराध्यक्षा भंगाळे यांनी पोलीस अधीक्षकांकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, सावकारे व त्यांच्या काही सहकाऱ्यांनी संगनमताने उत्तर प्रदेशातील महोबा जिल्ह्यातील फत्तेपूर बजेरिया या ठिकाणी जाऊन काही कागदपत्रे मिळवली. त्यानंतर ही कागदपत्रे येथील जात पडताळणी समितीकडे पुराव्याच्या स्वरूपात सादर करण्यात आली.

समितीच्या दक्षता पथकाने या कागदपत्रांची तपासणी करून अहवाल सादर केला असला तरी, त्या अहवालात दाखवलेली शेती व संबंधित मालमत्ता ही भंगाळे किंवा त्यांच्या नातेवाईकांची नाही. ती पूर्णपणे इतर व्यक्तींची असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

**कामता प्रसाद नारायण नावावरुन वाद**

भंगाळे यांच्या तक्रारीनुसार अहवालात नमूद केलेली शेती तसेच जमीन व इतर मालमत्ता या भंगाळे किंवा त्यांच्या कुटुंबियांच्या मालकीच्या नसून पूर्णपणे इतर व्यक्तींच्या नावावर असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे संबंधित कागदपत्रांची सत्यता संशयास्पद ठरत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. विशेषतः या कागदपत्रांमध्ये कामता प्रसाद नारायण या व्यक्तीचे नाव नमूद असून त्यांचा भंगाळे कुटुंबाशी कोणताही (पान २ वर)

**थोडक्यात**



**दिल्ली विमानतळावर दोन विमानांची धडक**

**नवी दिल्ली ।** येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवारी दुपारी दोन विमानांमध्ये झालेल्या धडकेमुळे एकच खळबळ उडाली. पार्किंग परिसरात उभ्या असलेल्या अकासा एअरलाइनच्या विमानाला स्पाईसजेटच्या विमानाने धडक दिली. या भीषण अपघातात दोन्ही विमानांच्या पंखांचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**एका दिवसात २३० रुपयाचा शेअर पोहचला १८०० रुपयांवर**

**वॉशिंग्टन ।** शू निर्माता ऑलबड्र्सने निधी उभारण्याची आणि स्वतःला एआय कंप्युटिंग इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी म्हणून पुनर्स्थापित करण्याची घोषणा केल्यानंतर बुधवार, १६ एप्रिल रोजी, कंपनीच्या शेअरच्या किमतीत जवळपास ६००% वाढ झाली. ऑलबड्र्स आता आपले नाव बदलून न्यूबर्ड एआय ठेवणार असून क्लाउड कंप्युटिंग क्षमता आणि एआय सेवांवर लक्ष केंद्रित करण्याची योजना जाहीर केली. ऑलबड्र्स इंक कंपनीच्या शेअरची किंमत २.४९ डॉलर म्हणजे सुमारे २३० रुपयांच्या आसपास होती, पण दिवसाच्या शेवटी १६.९९ डॉलर्स किंवा १,८४० रुपयांच्या आसपास उसळली. अशाप्रकारे एका दिवसात शेअरने ५८२ टक्के वाढ नोंदवली असून तोट्यात जाणाऱ्या कंपनीला एआयने अशी चालना दिली की गुंतवणूकदार रातोरात श्रीमंत झाले .



**पहिल्याच क्षेपणास्त्राने अमेरिकन जहाजे बुडवू**

**तेहरान ।** अमेरिकेने इराणच्या बंदरांवर नौदल नाकेबंदी लादली आहे. इस्लामाबादमध्ये दोन्ही बाजूंमधील शांतता चर्चा निष्फळ ठरल्यानंतर ट्रम्प यांनी हा निर्णय घेतला. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने इराणच्या बंदरांमध्ये येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व जहाजांना थांबवण्याची घोषणा केली. याला प्रत्युत्तर म्हणून, इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या एका सल्लागाराने होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अमेरिकेची जहाजे बुडवण्याची धमकी दिली आहे.

## टीसीएस प्रकरणात धर्मांतरासाठी कट्टरतावादी संघटनांकडून आर्थिक बळ?

वृत्तसंस्था । नाशिक

**नामांकित टीसीएस कंपनीच्या नाशिक प्रकल्पात संशयित संघटितपणे गट स्थापून कार्यरत होते. लग्नाचे अमिष दाखवून लैंगिक शोषण, कामाच्या ठिकाणी छळ आणि एका युवकाच्या धर्मांतराचा प्रयत्न आदी प्रकरणी आठ अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुद्ध एकूण नऊ गुन्हे दाखल आहेत.**



संशयितांच्या कारवायांना धार्मिक कट्टरपंथी गट किंवा संघटनांकडून आर्थिक रसद पुरवली जात होती का, याची छाननी केली जाणार आहे. या अनुषंगाने नाशिक पोलिसांनी इंटेलिजन्स ब्युरो (आयबी), राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए), दहशतवाद विरोधी पथकाशी (एटीएस) पत्रव्यवहार केला आहे.

टीसीएस सारख्या नावाजलेल्या बहुराष्ट्रीय कंपनीत महिलांविषयक असे प्रकार घडल्याने त्याचे गांभिर्य वाढले. कंपनीत कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून २०२२ ते २०२६ या कालावधीत विनयभंग, लैंगिक आणि मानसिक अत्याचार, धार्मिक भावना दुखावणे, धर्मांतर असे प्रकार घडले. लग्नाचे अमिष दाखवून संशयिताने लैंगिक शोषण केल्याची तक्रार आल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करुन कंपनीतील घटनाक्रमाविषयी माहिती घेण्यास सुरुवात केली. (पान २ वर)

**इराण-अमेरिका युद्धाचा राज्यातील शेतकऱ्यांना मोठा फटका**

## केळी २ रुपये प्रतिकिलोने विकण्याची वेळ

प्रतिनिधी । जळगाव

**आखाती देशातील तणावाचा फटका भारतातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. फक्त २ रुपये किलोप्रमाणे केळीची विक्री करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. त्यामुळे केळी उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. दरम्यान, इराण-अमेरिका युद्धाचा भारतातील शेतकऱ्यांवर नेमकं कसा परिणाम झाला? त्यामुळे शेतकरी संकटात कसा सापडला? २२ रुपयांवरून २ रुपये प्रति किलोने केळी विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर कशी आली?**



मध्य-पूर्वेकडील निर्यातीत व्यत्यय आल्यामुळे केळीचे शेकडो कंटेनर शीतगृहांमध्ये अडकून पडले आहेत. कारण युद्धाच्या परिस्थितीमुळे त्याची जागतिक स्तरावर वाहतूक होऊ शकत नाही. या मालाची वाहतूक थांबल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात जाणारा माल हा देशांतर्गत बाजारात वळवण्यात येत असल्यामुळे दरात मोठी घसरण होत आहे. याचं उदाहरण म्हणजे फेब्रुवारीमध्ये शेतकऱ्यांना १८ ते २२ रुपये प्रति किलो दराने केळीला दर मिळत होता. मार्चपर्यंत तो ८-१० रुपये प्रति किलोपर्यंत घसरला आणि एप्रिलमध्ये तोच दर आणखी कोसळून फक्त २ ते ३ रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील शेतकरी भागवत होळकर यांच्याकडे १० एकर जमिनीवर केळीची लागवड करण्यात आलेली होती. त्यांच्या म्हणण्यांनुसार यासाठी त्यांनी गेल्या वर्षी खते, ठिबक सिंचन आणि इतर गोष्टींवर अंदाजे २० लाख रुपये खर्च केला होता. त्यांच्या म्हणण्यांनुसार, फेब्रुवारीमध्ये सर्वाधिक २२ रुपये प्रति किलो दर मिळाला होता. मात्र, अमेरिका-इराण युद्ध सुरू झालं आणि निर्यातीवर निर्बंध आले. त्यामुळे राज्यभरातील पीक देशांतर्गत बाजारात वळवण्यात आलं, याचाच फटका बसला आणि दर कोसळले. सध्याच्या २ ते ३ रुपये प्रति किलो दराने आता माझ्या पिकाचे अंदाजे फक्त २.५ ते ३ लाख रुपये वसूल होतील.

इराण-अमेरिका युद्धामुळे महाराष्ट्रातील केळीचा व्यापार विस्कळीत झाल्याचं चित्र आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर एक संकट ओढावलं आहे. या संकटामुळे महाराष्ट्रातील प्रमुख केळी उत्पादक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना आपली पीकं सोडून द्यावी लागत आहेत किंवा नष्ट (पान २ वर)

## खान्देशी परंपरेचा जल्लोष; महिलांसाठी स्पर्धांची रेलचेल!

### अमळनेरमध्ये यंदा पहिल्यांदाच 'आखाजी महोत्सव'

प्रतिनिधी । जळगाव

**खान्देशातील पारंपरिक सण-उत्सवांमध्ये विशेष स्थान असलेला आखाजी अर्थात अक्षय तृतीयेचा सण यंदा अमळनेर शहरात अभूतपूर्व उत्साहात साजरा होणार आहे. अहिराणी वाङ्मय दिन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या दिवसाचे औचित्य साधत खान्देश साहित्य संघाच्या वतीने प्रथमच भव्य आखाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, हा महोत्सव केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न राहता खान्देशी ओळख, परंपरा आणि भाषिक वारसा जपण्याचा व्यापक प्रयत्न ठरणार आहे.**



१७ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता एलआयसी कॉलनी परिसरातील खुल्या मैदानावर आखाजी महोत्सव रंगणार असून, यासाठी मोठ्या प्रमाणावर तयारी करण्यात आली आहे. कार्यक्रमस्थळी पारंपरिक सजावट, ग्रामीण वातावरणाची झलक आणि खान्देशी संस्कृतीची अनुभूती देणारी मांडणी करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून खान्देशातील लोकजीवन, रूढी-परंपरा, सण-उत्सव आणि विशेषतः अहिराणी भाषेचे जतन व संवर्धन करण्यावर भर देण्यात आला आहे. महोत्सवाला राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

ज्यामध्ये खासदार स्मिता वाघ, आमदार अनिल पाटील, माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील, माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, माजी आमदार शिरीष चौधरी, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर तसेच उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांचा समावेश आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी (पान २ वर)

**ग्रामीण संस्कृती आणि आखाजीच्या परंपरेवर मार्गदर्शन करण्यासाठी धुळे येथील अहिराणी लेखिका प्रा. डॉ. योगिता पाटील या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या भाषणातून खान्देशी परंपरेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक महत्त्व आणि आधुनिक काळातील गरज यावर प्रकाश टाकला जाणार आहे. या महोत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे पारंपरिक लोककला आणि महिला वर्गाच्या सहभागाला दिलेले विशेष स्थान. महिलांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा यासाठी खापरावरील पुरण पोळ्या बनविण्याची स्पर्धा ही पारंपरिक स्वयंपाक कलेचा वारसा जपणारी ठरणार आहे. झोक्यावर गायली जाणारी अहिराणी गीते, गौराईची पारंपरिक गाणी आणि जात्यावरील गाण्यांच्या स्पर्धा यामुळे ग्रामीण संस्कृतीचे जीवंत चित्र आखाजी महोत्सवात उभे राहणार आहे.**

## आर वैशालीने रचला इतिहास; पहिली भारतीय महिला बुद्धिबळ खेळाडू ठरली

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदाची बहीण आर वैशाली हिने सध्या सुरू असलेल्या फिडे महिला कॅन्डिडेट्स टूर्नामेंट २०२६ स्पर्धेत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. वैशालीने विजेतेपद पटकावून नवा इतिहास रचला आहे.**



चेन्नईच्या २४ वर्षीय वैशालीने बुधवारी पार पडलेल्या अखेरच्या १४व्या फेरीमध्ये रशियाच्या कॅटरीना लॅगनो हिला पराभूत करीत ८.५ गुणांची कमाई केली. हे जेतेपद मिळवणारी ती पहिली भारतीय महिला बुद्धिबळ खेळाडू ठरली असून, तिने जागतिक अजिंक्यपद (वर्ल्ड चॅम्पियनशिप) स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली आहे.जागतिक चॅम्पियनशिपच्या लढतीसाठी गेल्या १५ वर्षांत ती पात्र ठरणारी पहिलीच भारतीय महिला ठरली आहे. तिच्या या यशाने भारतीय बुद्धिबळाच्या सुवर्णयुगाची पुन्हा सुरुवात झाली आहे. या निकालामुळे बुद्धिबळाच्या इतिहासात फक्त दुसऱ्यांदाच एखादी भारतीय महिला वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या किताबासाठी लढणार आहे. तिच्याआधी कोनेरू हम्पीने २०११ मध्ये अल्बेनियातील तिराना येथे हौ यिफानविरुद्ध महिलांच्या किताबासाठी आव्हान दिलं होतं. कोनेरू हम्पीनंतर आता आर वैशाली गेल्या १५ वर्षांत ही कामगिरी करणारी पहिली खेळाडू ठरली.

# संपादकीय

## पर्जन्यमानातील विषमता

स्कायमेट या खासगी हवामान संस्थेने यंदाच्या मान्सूनबाबत व्यक्त केलेल्या अंदाजांमुळे चिंतेत भर पडली आहे. पॅसिफिक महासागरातील 'एल निनो'चा वाढता प्रभाव आणि 'ला निना'चा काढता पाय, या भौगोलिक घडामोडींचा थेट फटका भारताच्या पर्जन्यमानावर बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सिंचन सुविधांचा विस्तार होऊनही आपल्या देशातील बहुतांश शेती मान्सूनवर अवलंबून आहे. पाऊस कमी किंवा उशिरा झाला तर शेती उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. २०१५ व २०१७ ही दोन वर्षे महाराष्ट्रात भीषण दुष्काळी स्थिती होती तेव्हा कृषीक्षेत्राचा विकासदर दीड ते दोन टक्क्यांनी घसरला होता. दुष्काळी स्थितीमुळे कृषी व संलग्न क्षेत्रात दोन वर्षे मंदी दिसून आली होती. कृषीसामग्रीसह अन्य अनेक क्षेत्रांमध्ये मागणी आक्रसल्याचे दिसले होते. त्यातून रोजगारावरही प्रतिकूल परिणाम झाला होता. देशात मान्सूनच्या काळात सरासरी ८९ सेंमी पाऊस पडतो. गेल्या ५० वर्षांतील नोंदीनुसार मान्सूनच्या सरासरीच्या ९६ ते १०४ टक्के एवढा पाऊस नोंदण्यात आला आहे. चांगल्या पावसाचा परिणाम खरीप पिकांच्या उत्पादनावर होतो आणि त्यामुळे काही विशेष खाद्यान्नाचे भाव कमी होऊ शकतात. तांदूळ, बाजरी, कापूस, मका, सोयाबीन आदी खरीप पीक असून त्यांचे उत्पादन बहुतांशवेळा चांगल्या पावसावर अवलंबून असते. त्यांची पेरणी जून-जुलैपासून सुरू हेते. अशावेळी पाऊस चांगला राहिला तर त्यांचे उत्पादन वाढेल आणि महागाईवर काही प्रमाणात नियंत्रण मिळवता येणे शक्य आहे. विशेषतः ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पावसाचे प्रमाण ८९ ते ९२ टक्के राहण्याचा अंदाज आहे. हे दोन महिने खरीप हंगामातील पिकांच्या वाढीसाठी आणि दाणे भरण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. पंजाब, हरियाणा आणि राजस्थान यांसारख्या राज्यांमध्ये पावसाची घट झाल्यास अन्नधान्याच्या उत्पादनावर थेट परिणाम होईल. मध्य भारतात सोयाबीन आणि कापसाच्या पिकाला या पावसाच्या तुटीचा मोठा फटका बसू शकतो. पावसाची सरासरी कमी होणे म्हणजे केवळ पिकांचे नुकसान नव्हे, तर धरणांमधील पाणीसाठा कमी होणे आणि पर्यायाने पुढील वर्षाच्या उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचे तसेच सिंचनाचे संकट ओढवणे होय. मान्सूनची साथ लाभल्याखेरीज देशाच्या आर्थिक विकासाची चाके गतिमानतेने फिरत नाहीत. मान्सूनच्या सरासरीबरोबरच त्याचे वितरणही समाधानकारक होणे आवश्यक आहे. अलीकडील काळात पर्जन्य वितरणातील विषमता वाढत आहे. पावसाचे दिवस कमी होत आहेत. कमी कालावधीत जास्त पाऊस पडण्याच्या घटना वाढत आहेत. पूर्वी जवळपास ७० ते ८० दिवस पाऊस पडत होता. आता पावसाचे दिवस घसरत घसरत ३० पर्यंत खाली आले आहेत. म्हणजेच ३० दिवसांत पडणारा पाऊस आपल्याला ३६५ दिवस सांभाळून ठेवायचा आहे. तरच आपल्याला वर्षभर पाणी मिळू शकेल. एका अंदाजानुसार, दरवर्षी भारतात पुढील दोन वर्षे पुरेल इतका पाऊस दरवर्षी पडतो. पण आपण त्याचे संकलनच करत नाही. पूर्ण भारतामध्ये केवळ १० टक्के पाण्याचे संकलन होते. ही स्थिती बदलण्याची प्रतीक्षा आजही कायम असणे हे आपल्या व्यवस्थेचे अपयश आहे. सिंचनाच्या मुद्द्यावरून राजकारण रंगते, आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडतात, प्रचंड निधी खर्च होतो; पण तरीही एखाद्या वर्षी पावसाने दडी मारली, मान्सूनचे आगमन लांबले, कमी पाऊस झाला तर संबंध कृषीक्षेत्राचे अर्थकारण कोलमडते. याचे कारण पडणारा पाऊस अडवण्यासाठी, जमिनीत मुरवण्यासाठी, धरणांमध्ये साठवण्यासाठी आणि त्याचे वितरण निर्दोष करण्यासाठी काटेकोरपणाने नियोजनच कधी केले गेले नाही. दरवर्षी मोठमोठ्या घोषणांचे फुगे हवेत सोडून जनतेची दिशाभूल करत राहण्यात आपल्या शासनकर्त्यांनी समाधान मानले; पण त्यामुळे पाणीप्रश्न तसाच कायम राहिला. आतातरी जागृत होणे गरजेचे आहे.

# तांत्रिक अडचणींवर मात करत शहराचा पाणीपुरवठा कार्यान्वित

## कलाली डोहातून पाणी उपसा; अमळनेर नगरपरिषदचे युद्धपातळीवर प्रयत्न

प्रतिनिधी । अमळनेर



**वाढत्या उन्हाळ्यामुळे निसर्गाची साथ कमी मिळत असतानाही अमळनेर नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने अत्यंत प्रभावी नियोजन केले आहे. जळोद नदीची पातळी घटल्याने निर्माण झालेल्या संकटावर मात करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कलाली डोहातून पाणी उपसा सुरू करून शहराला दिलासा दिला आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे जळोद नदीपात्रात पाणी कमी झाले आहे.**

यापूर्वी दोन्ही जलशुद्धीकरण केंद्रांमधून मिळून प्रति तास ८ लाख लिटर पाण्याचा उपसा होत होता. मात्र, तापी नदीची पाणी पातळी खालावल्यामुळे सध्या हा उपसा प्रति तास ६ लाख लिटरवर आला आहे. म्हणजेच तांत्रिकदृष्ट्या प्रति तास दीड ते दोन लाख लिटरची घट झाली असली, तरी कलाली पंपिंग सुरू करून प्रशासनाने हा पुरवठा खंडित होऊ न देण्याची मोठी कामगिरी केली आहे. पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले की, हिवाळा आणि पावसाळा ऋतूमध्ये नागरिकांची पाण्याची मागणी तुलनेने कमी असते, त्यामुळे वितरण करणे सोपे जाते. परंतु, उन्हाळा सुरू होताच नागरिकांची पाण्याची मागणी प्रचंड वाढते. त्यातच उन्हाळ्यात वीजपुरवठा खंडित होण्यासारख्या तांत्रिक समस्या उद्भवतात. मागणी जास्त आणि उपसा कमी अशी स्थिती असतानाही, प्रशासन उपलब्ध पाण्याचे समन्यायी वाटप करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे.

**सखाराम महाराज यात्रेसाठी प्रशासन सज्ज**

येत्या ५ ते ७ दिवसांत सुरू होणाऱ्या संत सखाराम महाराज यात्रेसाठी प्रशासनाने बॅकअप प्लॅन तयार केला आहे. यात्रेकरूंना पूर्ण दाबाने पाणी मिळेल, सर्व तांत्रिक उपाययोजना पूर्ण झाल्या आहेत, अशी माहिती पाणीपुरवठा सभापती कैलास नामदेव पाटील यांनी दिली आहे.

माजी आ. शिरीष चौधरी, न.पा. मुख्याधिकारी गणेश शिंदे आणि नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, पाणीपुरवठा सभापती कैलास नामदेव पाटील यांच्या नेतृत्वाखाली अभियंता सत्यम पाटील, प्रवीणकुमार बैसाणे व पाणी पुरवठा कर्मचारी विजय विसावे, विशाल देवरे व कर्मचाऱ्यांची टीम फिल्डवर राहून परिस्थिती हाताळत आहे. उपसा कमी झाला असला तरी उपलब्ध ६ लाख लिटर पाण्याचे योग्य नियोजन करून प्रत्येक भागाला पाणी पोहोचवण्याचे काम ही टीम करत आहे.

**पाण्याचा वापर काटकसरीने करावा**

मागणी वाढलेली असताना आणि नैसर्गिकरीत्या उपसा कमी झालेला असताना, नागरिकांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखावे. प्रशासनावर ताण न आणता पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करून सहकार्य करावे, असे आवाहन अमळनेर नगरपरिषदेमार्फत करण्यात आले आहे.

# ॲड.ललिता पाटील स्कूलची दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षेत १००% निकालाची परंपरा कायम

## अक्षरा भामरे अमळनेर-पारोळा विभागात प्रथम



प्रतिनिधी । अमळनेर

**येथील ॲड.ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूलचा सीबीएसई बोर्डाचा इयत्ता दहावीचा २०२५-२६ निकाल शंभर टक्के लागला आहे. माध्यमिक विभागातून अक्षरा भामरे हिने ९८.२०% मिळवत सीबीएसई बोर्डाच्या परिक्षेत अमळनेर-पारोळा विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यासह इयत्ता दहावीच्या निकालात पुढील ५ विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले.**

पलक पाटील ९६.४०%, मोहित पवार ९५.२०%, नैतिक सेनानी ९५.२०% व वैष्णवी माळी ९४.४०% मिळवत प्रथम पाचमध्ये येण्याचा मान पटकावला आहे. अक्षरा हिने इंग्लिश आणि माहिती तंत्रज्ञानात १०० पैकी १०० तर पलक पाटील हिने मराठीत १०० पैकी १०० गुण मिळवले. यावर्षी देखील सीबीएसई माध्यमिक विभागात शाळेने पंचक्रोशीत १००% निकालाची परंपरा कायम राखली असून इयत्ता दहावीच्या निकालात नेत्रदीपक गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. परीक्षेत एकूण १०५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. विद्यार्थ्यांच्या यशात सर्व विषय शिक्षकांसह इतर सर्व शिक्षकांनी देखील मेहनत घेतली असून विद्यार्थ्यांच्या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा ॲड.ललिता पाटील, सचिव प्रा.श्याम पाटील, संचालक पराग पाटील व प्रा. देवेश्री आणि प्राचार्य डॉ.नीरज चव्हाण यांनी कौतुक केले.

# कन्हेरे येथे सुपोषण राष्ट्रीय अभियानाचा जागर

प्रतिनिधी । अमळनेर




**अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीच्या जनजागराचा रथ दि. १५ एप्रिल रोजी तालुक्यातील कन्हेरे येथे पोहोचला. त्यानंतर चिंचदेवी मंदिरातील सभा मंडपात महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या बहुमोल सहकार्यातून कार्यक्रमाचे मुख्य अतिथी तथा लोकनियुक्त सरपंच चंद्रकांत नेरकर यांच्या हस्ते विधिवतरीत्या भूमीमातेचे पूजन तसेच सेंद्रिय शेतीबद्दलचा जागर करण्यात आला.**

यावेळी कन्हेरे गाव व मंडळ परिसरातील शेतकऱ्यांनी आपापल्या गावांतील शेतांमधून आणलेल्या मातीचा भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरणात पूजनाचा कार्यक्रम झाला. याप्रसंगी मंडळ कृषी अधिकारी प्रफुल्ल पाटील, सहाय्यक कृषी अधिकारी राजेश प्रकाश बोरसे, उपकृषी अधिकारी दिनेश पाटील, आत्माचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक भूषण पाटील यांच्यासह मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस.एन.पाटील, ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील, अकाऊंट मॅनेजर मनोहर तायडे यांच्यासह श्री मंगळग्रह मंदिराचे पुरोहित प्रसाद भंडारी, गणेश जोशी तसेच सेवेकरी राजेंद्र पाटील, उज्ज्वल अहिरराव, दीपक पाटील, शुभम शिसोदे, अक्षय पाटील उपस्थित होते. सुरूवातीला व्यासपाठीवरील मुख्य अतिथी तथा लोकनियुक्त सरपंच चंद्रकांत नेरकर यांच्यासह सर्व मान्यवरांचा मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेरच्यावतीने सुबोध पाटील यांनी श्री मंगळग्रह देवाची प्रतिमा भेट देऊन यथोचित सन्मान केला. तसेच सुबोध पाटील यांनी भूमी सुपोषण चळवळीची पार्श्वभूमी सविस्तरपणे उपस्थितांना समजावून सांगितली. त्यानंतर मंदिराच्या पुरोहितांकडून मंडळातील विविध गावांतून संकलित केलेली एक मूठ माती एका ठिकाणी एकत्रित करून तिचे विधिवतरीत्या पूजन करण्यात आले. कृषी विभागाचे प्रफुल्ल पाटील यांनी आपले पूर्वज पिढ्यानपिढ्या सेंद्रिय व सकस शेती करीत असल्याने आपल्या मुला-बाळांचे आरोग्य निरामय राहत होते, हे विसरून चालणार नाही, असे त्यांनी सांगितले. भूषण पाटील यांनी निंबोळी अर्क या विषयी माहिती दिली.

# १९ प्रवाशांसाठी बसचालक ठरला देवदूत

## कंटेनरच्या धडकेनंतर बस दुभाजकावर आदळण्यापासून वाचवली

प्रतिनिधी । नवापूर



**यावलहून वापीकडे (गुजरात) निघालेल्या बसला शेजारून चाललेल्या कंटेनरने अचानक हुलकावणी देत धडक दिली. या अपघातात बस चालकाने प्रसंगावधान राखून बसवर नियंत्रण मिळवित मोठा अपघात टळला. यामुळे त्या बसमधील १९ प्रवाशांचा जीव वाचला.**

पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की, यावल ते वापी ही बस (क्र.एमएच २०, बीएल ३९२२) धुळे-सुरत महामार्गावरून जात असताना एक कंटेनर या बसच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करीत होता. नवापूर तालुक्यातील सोनखांब गावाजवळ निमदर्डा फाट्यानजीक हॉटेल युवराजसमोर एक व्यक्ती रस्ता ओलांडत असताना कंटेनर चालकाने त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र, या प्रयत्नात कंटेनर बसवर जोरदार धडकला. यामुळे बसचा समोरील भाग चक्काचूर झाला. अचानक झालेल्या या घटनेमुळे बसमधील प्रवासी धास्तावले होते. अशा कठीण प्रसंगात धीर न सोडता बसचालक भिका तडवी याने प्रसंगावधान राखत बसवर नियंत्रण मिळवले आणि दुभाजकावर आदळण्यासाठी निघालेली बस थांबवली. बसचालकाच्या या प्रसंगावधानामुळे बसमधील एकाही प्रवाशाला दुखापत झाली नाही आणि सर्वांचा जीव वाचला. दरम्यान या घटनेनंतर स्थानिक नागरिक, हॉटेल व्यावसायिक आणि इतरांनी तत्काळ बसकडे धाव घेत प्रवाशांना बसमधून खाली उतरवून घेत त्यांना धीर दिला. या घटनेची माहिती मिळताच विसरवाडी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नरेंद्र साबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. काही वेळाने सर्व १९ प्रवाशांना सुरक्षितपणे पुढील प्रवासासाठी चाळीसगाव-सुरत बसने रवाना करण्यात आले. या अपघातानंतर कंटेनर चालक वाहनासह घटनास्थळावरून फरार झाला. याप्रकरणी विसरवाडी पोलिसांत कंटेनर चालकाविरोधात गुन्हा नोंदविला.

# पान १ वरुन

### विरोध करणाऱ्यांना दीर्घकाळ......

शब्द हवा असेल तर मग मी त्याचा वापर करतो. तमिळमध्ये कोणता अधिक चांगला शब्द असेल तर तो बोलायलाही मी तयार आहे. कारण नियत साफ असेल तर शब्दछल करण्याची गरज भासत नाही, असं म्हणत मोदींनी दक्षिणेकडील राज्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

### भुसावळच्या नगराध्यक्षांची मंत्री......

संबंध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. भंगाळे यांनी पुढे नमूद केले आहे की, नावातील साधर्म्याचा गैरफायदा घेत मुद्दाम चुकीची माहिती तयार करून ती अधिकृत प्रक्रियेत सादर करण्यात आली. कामता प्रसाद नारायण यांचा जन्म १९५९ साली झालेला असून, भंगाळे यांच्या आजोबांचा जन्म १९२४ साली झाला आहे. त्यामुळे दोन्ही व्यक्तींमध्ये कोणताही कौटुंबिक संबंध असण्याचा प्रश्नच येत नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले आहे. या संपूर्ण प्रकरणात रजनी संजय सावकारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी एकत्र येऊन जाणीवपूर्वक फसवणूक केल्याचा आरोप करत भारतीय न्याय संहितेच्या कलम ४२० (फसवणूक) आणि १२० (ब) (कटकारस्थान) अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

### केळी २ रुपये प्रतिकिलोने......

करणं भाग पडत आहे. महाराष्ट्रातील केळीचे प्रमुख केंद्र मानल्या जाणाऱ्या जळगाव आणि सोलापूर सारख्या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी एक आश्वासक हंगाम म्हणून सुरू झालेला काळ आता आर्थिक आपत्तीमध्ये बनत असल्याचं चित्र दिसत आहे. बारामतीमधील शेतकरी किशोर करांडे यांनी सांगितलं की, आता आर्थिक गणित जुळत नाही. कारण भाव इतके कमी आहेत की मला वाहतूक आणि मजुरीचा खर्चही निघत नाही. मी केळीची लागवड नष्ट करत असून त्या ठिकाणी उसासाठी तयार करत आहे. व्यापाऱ्यांनी आम्हाला योग्य दर द्यावा, जेणेकरून आम्ही अशा परिस्थितीत किमान तग धरू शकू, अशी भावना करांडे यांनी व्यक्त केली. तसेच जळगावचे केळी उत्पादक शेतकरी हनुमान डाके यांनी याबाबत बोलताना म्हटलं की, उत्पन्न मोठ्याप्रमाणात घटलं असलं तरी लागवडीचा खर्च, खते, कीटकनाशके, मजुरी, सिंचन आणि इतर गोष्टींचा खर्च वाढत असल्याने अनेक शेतकरी कर्ज फेडण्यासाठी आणि आपला व्यवसाय चालू ठेवण्यासाठी धडपडत आहेत. आता राज्य आणि केंद्र सरकारला नुकसान भरपाई देण्यासाठी हस्तक्षेप करण्याची आणि संयुक्त अरब अमिरात, इराण, इराक यांसारख्या देशांऐवजी पर्यायी देशांत निर्यातीची संधी सरकारने उपलब्ध करावी, अशी मागणी शेतकरी वर्गांकडून केली जात आहे.

### टीसीएस प्रकरणात धर्मांतरासाठी......

महिला पोलीस अधिकारी आणि अंमलदार साध्या वेशात टीसीएसच्या कार्यालयात पोहोचल्या. महिला कर्मचाऱ्यांना भेटून धीर देणे, त्यांचे समूपदेशन करून मनोबल वाढविले. त्यानंतर कंपनीतील अन्य महिला तक्रारी देण्यासाठी पुढे आल्याचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी नमूद केले. या संदर्भात दाखल गुन्ह्यात पोलिसांनी आतापर्यंत दानिश शेख (३१, भाभानगर), तौफिख अत्तार (३४, सात्विकनगर, अशोका मार्ग), शाहरूख हुसैन कुरैशी (३४, अशोक मार्ग), रझा रफिक मेमन (३५, मुरादशाह दर्ग्यासमोर), असिफ अन्सारी, शफी शेख आणि अश्विनी चैनानी (५१, लुलानगर, पुणे) यांना अटक केली आहे. संशयितांची पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली. यातील संशयित निदा खान मात्र अजूनही पोलिसांच्या हाती लागलेली नाही. संशयितांनी गट स्थापून संघटीतपणे कंपनीत पीडितांना त्रास देणे, त्यांच्या धार्मिक भावना दुखावणे, विनयभंग आदी प्रकार केले. पीडितेवरील अत्याचार प्रकरणी दाखल पहिल्या गुन्ह्यात संशयित पीडितेला रिसॉर्टवर घेऊन गेला होता. तेथील पुरावेही तपास यंत्रणेने ताब्यात घेतले आहेत.

### खान्देशी परंपरेचा जल्लोष......

खान्देश साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी राहणार असून, उद्घाटक म्हणून भाजपाचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे उपस्थित राहतील. स्वागताध्यक्ष म्हणून बाजार समितीचे सभापती अशोक पाटील जबाबदारी सांभाळतील. विजेत्यांना रोख बक्षीसे, प्रमाणपत्र याशिवाय, पारंपरिक वेशभूषा स्पर्धा आणि एक मिनिटात उखाणे या स्पर्धांमुळे महिलांना आपली कला आणि सर्जनशीलता सादर करण्याची संधी मिळणार आहे. प्रत्येक स्पर्धेत विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असून प्रथम क्रमांकासाठी ५ हजार रुपये, द्वितीयसाठी ३ हजार रुपये आणि तृतीयसाठी २ हजार रुपये तसेच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.'गौराई' या सन्मानचिन्हाद्वारे विजेत्यांचा गौरव करण्यात येईल.

# पाचोरा बसस्थानकात चोरी करणारी महिला जेरबंद

प्रतिनिधी । जळगाव



**जिल्ह्यात विविध तालुक्यातील बसस्थानक परिसरात चोरी करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन कारवाई करण्याबाबत पोलीस अधीक्षकांनी आदेश दिले. त्याअनुषंगाने पाचोरा पोलिस ठाण्याचे पो.नि. राहुलकुमार पवार यांनी पाचोरा बसस्थानकात चोरी करणारी महिला जेरबंद केली.**

दि.१५ एप्रिल रोजी फिर्यादी जयश्री स्वप्नील पाटील (वय २२ रा.विवेकानंद कॉलनी, भडगाव) ही फिर्यादी महिला आसनखेडा येथून पाचोरा येथे बसने एम.एम. कॉलेज येथे पेपर देण्यासाठी आली असताना पेपर संपवून दुपारी साडेबारा वाजेपर्यंत वाजे सुमारास सुमारास पाचोरा बस स्टँड येथून आसनखेडा येथे जाण्यासाठी जळगाव बस मध्ये बसून जात असताना फिर्यादीच्या गळ्यातील तीन ग्रॅम वजनाची सोन्याची पोत कोणीतरी अज्ञाताने चोरून नेल्याबाबत पाचोरा पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली आहे. यावरून पाचोरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाचोरा पोलिसांनी अज्ञात आरोपींचा शोध घेत असताना गोपनीय माहितीच्या आधारे संगीता करण सोळुंखी, (वय ४२) वर्षे ही पाचोरा बस स्टँड परिसरात चोरी करण्याच्या इराद्याने संशयितरित्या फिरत असल्याची माहिती प्राप्त होताच गुन्हे शोध पथकाने सदर महिलेस ताब्यात घेऊन गुन्ह्या बाबत विचारपूस केली असता तिने गुन्ह्याची कबुली देऊन गुन्ह्यातील चोरलेला मुद्देमाल एक सोन्याचा मनी व दोन डोरले असा मुद्देमाल काढून दिला. प्रभारी पो.नि. राहुलकुमार पवार, पोलिस उपनिरीक्षक कृष्णा घायाळ, सहा फौजदार विलास पाटील, पोलिस कॉन्स्टेबल श्रीकांत गायकवाड, अंमलदार पो.कॉ. योगेश पाटील, पोकॉ. गणेश कुंवर, महिला पोलीस अंमलदार प्रिया आहेर यांनी कारवाई केली आहे.

# डॉ. उल्हास पाटील सीबीएसई स्कूलचा १०० टक्के निकाल

प्रतिनिधी । भुसावळ

येथील डॉ. उल्हास पाटील सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलचा इयत्ता दहावीचा निकाला यंदाही १०० टक्के लागला आहे. दहावीच्या शालांत परीक्षेसाठी सर्व २११ विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश मिळविले आहे. यात ऋतुजा रमाकांत बऱ्हाटे हीने ९८.४० टक्के गुण प्राप्त करून शाळेतून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. डॉ. उल्हास पाटील सीबीएसई इंग्लिश मिडीअम स्कूलच्या निकालात केशिका पवन चौधरी हिने ९८ टक्के गुण प्राप्त करीत द्वितीय, तर हर्षमान जोनवाल याने ९७.८० टक्के गुण प्राप्त केले.

# झुरखेडा गावातील प्रलंबित प्रश्नांवर तात्काळ तोडगा काढा

## पीककर्ज न मिळाल्याने नुकसान भरपाई द्यावी; शेतकऱ्यांच्या न्याय मागणीसाठी आमरण उपोषण सुरु

प्रतिनिधी । धरणगाव



**जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळावा तसेच झुरखेडा गावातील प्रलंबित प्रश्नांवर तात्काळ तोडगा निघावा, या प्रमुख मागण्यांसाठी झुरखेडा येथे सुरू असलेल्या आंदोलनाने आता तीव्र स्वरूप धारण केले असून आमरण उपोषणाचा बुधवारी दुसरा दिवस होता. लोकनियुक्त सरपंच सुरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या उपोषणाला गावासह परिसरातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**

उपोषणाच्या पहिल्या व दुसऱ्या दिवशी मोठ्या संख्येने शेतकरी उपोषण स्थळी उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा दर्शवत आहेत. झुरखेडा येथील स्वयंभू महादेव मंदिराच्या आवारात हे आमरण उपोषण सुरू असून, परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. आंदोलनकर्त्यांनी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर गंभीर आरोप करताना म्हटले आहे की, शासनाच्या आदेशांचे उल्लंघन करून छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत शेतकऱ्यांकडून बेकायदेशीररीत्या व्याजाची वसुली करण्यात आली आहे. या प्रकरणी शासन स्तरावर अनेकदा पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. आंदोलनकर्त्यांनी आपल्या मागण्यांमध्ये काही महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. गुलाबराव बाबूराव देवकर यांच्यावरील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाची सखोल चौकशी करून सहकार मंत्र्यांनी दिलेली स्थगिती तात्काळ उठवावी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, शेतकरी सन्मान योजनेंतर्गत आकारण्यात आलेले व्याज तात्काळ परत करावे व पुढील काळात कोणतेही व्याज आकारू नये, अशीही मागणी आहे. मागील सहा वर्षांपासून पीककर्ज न मिळाल्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली आहे. याशिवाय, विभागीय सहनिबंधक, नाशिक संभाजी निकम यांच्यावर निष्काळजीपणा व कर्तव्यच्युतीबद्दल शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, मागण्यांवर तात्काळ सकारात्मक निर्णय न घेतल्यास उपोषणादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी शासन व प्रशासन यांची राहील, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. या आंदोलनाला विविध शेतकरी संघटनांकडून वाढता पाठिंबा मिळत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# दिव्यांग पुनर्वसन केंद्रास जि.प.सीईओंची भेट

## कामकाजाचा आढावा घेत, सेवांमध्ये अधिक गुणवत्ता वाढीसाठी करिश्मा नायर यांनी दिल्या सूचना

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नुकताच पदभार स्वीकारलेल्या करिश्मा नायर यांनी दि.१६ एप्रिल रोजी महाबळ परिसरातील दिव्यांग पुनर्वसन केंद्रास अचानक भेट देऊन पाहणी केली.**





या भेटीदरम्यान त्यांनी केंद्रातील विविध विभागांची सखोल पाहणी करत तेथील सुविधा, उपलब्ध सेवा तसेच लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या उपचार व पुनर्वसन प्रक्रियेची माहिती घेतली. उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून केंद्राच्या एकूण कामकाजाचा आढावा घेत, सेवांमध्ये अधिक गुणवत्ता व परिणामकारकता आणण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना दिल्या. यावेळी त्यांनी दिव्यांग लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व गरजा जाणून घेतल्या. दिव्यांग व्यक्तींना सुलभ, दर्जेदार व वेळेत सेवा मिळणे अत्यंत आवश्यक असून, त्यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने काम करावे, असे निर्देश त्यांनी संबंधितांना दिले. तसेच पुनर्वसन केंद्रातील सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबतही त्यांनी सूचित केले. केंद्राच्या कामकाजात अधिक पारदर्शकता व कार्यक्षमता आणण्यावर भर देत, शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी केले.

**बहिणाबाई मार्टची पाहणी**

जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी दि.१५ एप्रिल रोजी शहरातील कोंबडी बाजार परिसरात उभारण्यात आलेल्या बहिणाबाई मार्टला भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. जिल्हा परिषद व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून महिला बचतगटांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कोंबडी बाजार येथील अल्पबचत भवनामध्ये बहिणाबाई मार्ट उभारण्यात आले आहे. या भेटीदरम्यान सीईओंनी मार्टमधील विविध स्टॉल्सना भेट देऊन तेथे विक्रीस ठेवण्यात आलेल्या वस्तूंची पाहणी केली.

यावेळी त्यांनी महिला बचतगटांनी तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत त्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले. तसेच उत्पादनांच्या पॅकेजिंग, ब्रँडिंग व विपणनावर अधिक भर देण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. या प्रसंगी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक आर. एस.लोखंडे, हरीश भोई, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पांढरे व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात

### २० एप्रिलला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

**जळगाव ।** जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन दि. २० एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांच्या दालनात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी ऋषिकेश काळे यांनी दिली आहे. समस्याग्रस्त व पिडीत महिलांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा. या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी. यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिन जिल्हा स्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी राबविण्यात येतो. त्यानुसार २० एप्रिल रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

### जळगाव जिल्हा कारागृहात महापुरुषांची जयंती उत्साहात

**जळगाव ।** जळगाव जिल्हा कारागृहात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त संयुक्त कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ७.३० ते १०.३० या वेळेत पार पडलेल्या कार्यक्रमात कारागृहातील अधिकारी, कर्मचारी तसेच बंदी बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कारागृहातील काही बंदी व अधिकारी व कर्मचारी यांनी मिळुन भक्ती गीतांचे गायन केले. तसेच काही बंदी बांधवांनी गाण्यांच्या तालावर नृत्य सादर केले. या कार्यक्रमास प्रभारी अधीक्षक डी. जी. चव्हाण, वरिष्ठ तुरुंगाधिकारी सी.व्ही.तायडे, तुरुंगाधिकारी दिलीपसिंग गिरासे उपस्थित होते.

## शिवसेना भुसावळ विधानसभा एसआयआर बीएलए प्रमुखपदी संतोष माळी

प्रतिनिधी । वरणगाव

**येथील रहिवासी शिवसेना (शिंदे गट) भुसावळ विधानसभा क्षेत्रप्रमुख संतोष माळी यांची आगामी एसआयआर २०२६ करिता भुसावळ विधानसभा बीएलए प्रमुखपदी नियुक्ती केल्याचे पत्र शिवसेना मध्यवर्ती कार्यालय मुंबई यांच्याकडून दि. १५ एप्रिल रोजी पत्र त्यांना प्राप्त झाले आहे.**



भुसावळ विधानसभा एसआयआर (विशेष सखोल पुनरिक्षण) २०२६ करिता बूथ लेव्हल एजंट (बीएलए) भुसावळ तालुका प्रमुखपदी संतोष बळीराम माळी यांची नियुक्ती शिवसेना पक्षाचे पदाधिकारी प्राधिकृत व्यक्ती म्हणून नियुक्ती शिवसेना पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथून करण्यात आली आहे. ही नियुक्ती उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे, सचिव संजय मोरे यांनी केली आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील, आ.चंद्रकांत पाटील, संपर्कप्रमुख आ. तुकाराम काते, जिल्हाप्रमुख समाधान महाजन, विलास मुळे यांच्यासह शिवसेनेचे नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले.

## आयुर्वेद महाविद्यालयात संविधान-शक्ती अभ्यास उपक्रम

**जळगाव ।** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव येथे संविधान-शक्ती : १२ तास सतत अभ्यास हा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात ३८ विद्यार्थ्यांनी सलग १२ तास शांततेत अभ्यास करून महापुरुषांना अभिवादन केले. या उपक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त तसेच सम्राट अशोक यांच्या विचारांचाही जागर करण्यात आला. सुरुवातीच्या सत्रात संविधान वाचनानंतर विद्यार्थ्यांनी बीएएमएस अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रित केले. उपक्रमाचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ.संतोष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सुभाषचंद्र मडावी, डॉ.सचिन नरवाडे व डॉ. रेणुका देव्हारे यांच्या हस्ते झाले.

## महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पौर्णिमा वुमन्स फाउंडेशनने जपली सामाजिक बांधिलकी

प्रतिनिधी । जळगाव

**क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पौर्णिमा वुमन्स फाउंडेशनच्या वतीने शहरातील पंडित नेहरू चौक, रेल्वे स्टेशनरोड येथे अभिवादन रॅली आणि मोफ त अन्न-पाणी वाटप स्टॉलचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.**




या अन्न-पाणी वाटप स्टॉलचे उद्घाटन जळगाव मनपाच्या महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका अंकिता पाटील आणि पोलीस कॉन्स्टेबल रवी तायडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे पोलीस कॉन्स्टेबल रवी तायडे यांनी उपस्थित महिलांशी साधलेला संवाद. आजच्या डिजिटल युगात महिला आणि बालकांनी सुरक्षित कसे राहावे, याबद्दल मार्गदर्शन करताना त्यांनी सायबर सुरक्षा या विषयावर अत्यंत मोलाची माहिती दिली. सोशल मीडियाचा वापर करताना घ्यायची काळजी आणि फसवणूक टाळण्याचे उपाय त्यांनी यावेळी समजावून सांगितले. एकलग्न येथील अशोक शिंदे आणि त्यांच्या संचाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित भीमगीते सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.

याप्रसंगी फाउंडेशनच्यावतीने सेवानिवृत्त सभासदांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पौर्णिमा वुमन्स फाउंडेशनच्या अध्यक्षा शालिनी बिराडे, सचिव किरण वनकर, कोषाध्यक्ष किरण भालेराव यांच्यासह फाउंडेशनच्या सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

## फुले-शाहू-आंबेडकर सामाजिक फाउंडेशनतर्फे बाबासाहेबांना मानवंदना

### बाबासाहेबांचे विचार, संविधान मूल्यांचा अंगीकार करा : अमोल कोल्हे

प्रतिनिधी । जळगाव

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती फुले-शाहू-आंबेडकर सामाजिक महापुरुष फाउंडेशनच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. हरीविठ्ठल नगर, बाजारपेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सकाळी अभिवादन सभा घेण्यात आली.**



सायंकाळी बाबासाहेबांची प्रतिमा सुशोभित केलेल्या वाहनावर ठेवून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत रिझर्व बँक, विजयस्तंभ यांची प्रतिकात्मक मांडणी करण्यात आली होती. तसेच 'आपण खातो त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही आहे रं' हा संदेश देत भाकरीचे आकर्षक डेकोरेशन करण्यात आले होते. जे फिरत्या स्वरूपात सादर करण्यात आले होते. डीजेच्या तालावर नाचत व आतषबाजीच्या जल्लोषात मिरवणूक पार पडली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानवी हक्क संरक्षण व जागृती समितीचे जिल्हाध्यक्ष अमोल कोल्हे होते. प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते कैलास हटकर, संविधान जागर अभियानाच्या सरोजिनी लभाणे व निखिल रांजणकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर बुद्ध वंदना तसेच त्रिसरण, पंचशील ग्रहण करुन अभिवादन करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात अमोल कोल्हे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अंगीकार करून त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. समाजातील प्रत्येक घटकाने संविधानिक मूल्ये आचरणात आणणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सरोजिनी लभाणे व निखिल रांजणकर यांनी संविधान जागर अभियानाबाबत मार्गदर्शन करून जनजागृतीची आवश्यकता स्पष्ट केली. सूत्रसंचालन विद्या झनके यांनी केले. आभार वंदना वानखेडे यांनी मानले.

या कार्यक्रमाचे आयोजन फाउंडेशनचे अध्यक्ष आकाश झिने यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी प्रशांत इंगळे, आकाश सपकाळे, आकाश तायडे, सागर साळुंखे, अक्षय सपकाळे, अभय सपकाळे, प्रेम सुरवाडे, भारत रंधे, लकी रंधे, सिद्धू झिने, ईश्वर सपकाळे, प्रशांत तायडे, सुभाष झिने, संजय सोनवणे, समाधान सोनवणे यांच्यासह फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यशस्वी आयोजनासाठी मंगल मैत्री ग्रुपच्या प्रमिला इंगळे, उषा इंगळे, छाया इंगळे, शोभा इंगळे, शैला पारधे, शोभा पाटोळे, विद्या झनके आदी महिलांचे सहकार्य लाभले.

## श्वान निर्बिजीकरण ठेक्यात मोठा घोटाळ्याचा संशय

### नगरसेविका प्रतीक्षा सोनवणे यांचा आरोप

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महापालिकेच्या झालेल्या दुसऱ्या महासभेत श्वान निर्बीजीकरणाच्या ठेक्यांवरून वाद उफाळला. नगरसेविका प्रतीक्षा सोनवणे यांनी या विषयावर गंभीर आरोप करत मोठा घोटाळा झाल्याचा संशय व्यक्त केला आणि प्रशासनाला थेट प्रश्नांच्या भडिमाराला सामोरे जावे लागले.**



महासभेत मांडलेल्या मुद्द्यांनुसार, मागील चार वर्षांत सुमारे ६.५ कोटी रुपयांचा खर्च कुत्रे निर्बीजीकरणासाठी दाखवण्यात आला आहे. एवढा मोठा खर्च असूनही प्रत्यक्षात कामाची पारदर्शकता, परिणामकारकता आणि प्रक्रिया यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. विशेष म्हणजे, ठेका देताना संस्थेवर कोणतेही गुन्हे दाखल नसावेत, अशी अट असताना उत्कर्ष नावाच्या संस्थेवर दोन स्वतंत्र गुन्हे दाखल असल्याचा आरोप सोनवणे यांनी केला. अशा परिस्थितीतही त्या संस्थेला टेंडर देण्यात आले कसे?, मक्तेदाराकडून ३० कर्मचारी तेथे असणे आवश्यक असताना, केवळ सहा कर्मचारी तिथे असतात. श्वानांवर शस्त्रक्रिया देखील व्यवस्थित केले जात नसून जिथून श्वान पकडले आहे तिथे देखील सोडले जात नसल्याचे आरोप त्यांनी केले, हा मुख्य मुद्दा त्यांनी आक्रमकपणे उपस्थित केला.

मी फक्त तीन दिवसांत पुरावे गोळा केले, मग इतक्या वर्षांपासून प्रशासन काय करत होते?असा थेट सवाल त्यांनी आरोग्य विभागाला केला. यावेळी सहाय्यक आयुक्त उदय पाटील यांना त्यांनी कडक शब्दांत सुनावले. कोणताही प्रश्न विचारला की समाधानकारक उत्तर मिळत नाही, उलट दिशाभूल केली जाते, असा आरोपही त्यांनी केला. या सगळ्या प्रकारावर महापौर दीपमाला काळे आणि उपमहापौर मनोज चौधरी यांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित विषयाची सखोल चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देताना त्यांनी प्रशासनाला कठोर शब्दांत सुनावले.

या संपूर्ण घडामोडीत आरोग्य विभाग पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. महासभेत प्रश्नांची सरबत्ती, ठोस उत्तरांचा अभाव आणि वाढता संशय यामुळे मॅन ऑफ द सभा हा किताब पुन्हा एकदा सहाय्यक आयुक्त उदय पाटील यांच्याच नावावर गेला, अशी उपरोधिक टीका रंगली. ही घटना केवळ एका ठेक्यापुरती मर्यादित नसून महानगरपालिकेच्या कामकाजातील पारदर्शकतेवर मोठा प्रश्न उभा करते. टेंडर प्रक्रियेत नियमांचे पालन झाले का? गुन्हे नोंद असलेल्या संस्थेला संधी का दिली? खर्च आणि प्रत्यक्ष काम यामध्ये तफावत आहे का? जर या प्रश्नांची ठोस उत्तरे मिळाली नाहीत, तर हा मुद्दा पुढील काळात मोठ्या चौकशीकडे वळू शकतो. त्यामुळे प्रशासनासाठी ही केवळ राजकीय टीका नसून विश्वासार्हता टिकवण्याची मोठी परीक्षा ठरणार आहे. महापौरांनी शहरातील नागरिकांशी हा खेळ मक्तेदार करत असेल तर त्याचे काम थांबवून नवीन मक्तेदार किंवा संस्थेचा शोध घेऊन त्यांना काम द्यावे, असा सूचना महापौर दीपमाला काळे यांनी दिल्या.

## जागतिक आरोग्य दिनानिमित्त मास्टरशेफ स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**येथील आयएमए जळगाव शाखा व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कम्युनिटी मेडिसिन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य दिनानिमित्त मास्टरशेफ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.**



नवीपेठेतील आयएमएच्या सभागृहात अध्यक्ष डॉ. धनंजय बोरोले, सचिव डॉ. पंकज शाह यांच्या मार्गदर्शनात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी कमी कॅलरीज असलेले व गॅसचा वापर न करता विविध पौष्टिक पदार्थ तयार केले होते. या स्पर्धेचे परिक्षण डॉ. शितल अग्रवाल, डॉ. सोनाली जैन यांनी केले. यावेळी याच विषयावर चर्चासत्र झाले. त्यात डॉ.अमित राजपूत, डॉ. चंचल शाह, डॉ.योगिता बावस्कर, डॉ. सताक्षी यांनी सहभागी होत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांचे शंकांचे निरसन केले. चर्चासत्रात वक्त्यांनी जीवनशैली, आहार, वजन कमी करण्याचे औषधे, व्यसने, मानसिक आरोग्य, लसीकरण, गर्भावस्था आणि आहार याविषयी सविस्तर माहिती दिली. स्पर्धकांना नवजीवन प्लस सुपरशॉपचे संचालक अनिल कांकरिया यांच्यातर्फे गिफ्ट कुपन तर मणियार होलसेलचे संचालक हरगोविंद मणियार यांच्यातर्फे पारितोषिके देण्यात आली. डॉ.दिलीप ढेकळे व डॉ.योगिता बावस्कर यांनी समन्वयकाची भूमिका बजावली. यशस्वीतेसाठी डॉ.रागिणी पाटील, डॉ.सुजाता महाजन, डॉ. समीर शाह, डॉ.अनघा चोपडे, डॉ.दर्शना शाह यांच्यासह आयएमएच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### ग्रीन ॲम्बेसेडर म्हणून डॉ. राणे यांची नियुक्ती

**भुसावळ ।** पृथ्वीची नैसर्गिक संसाधने, जैवविविधतेचे संवर्धन, निसर्गाशी सुसंवाद तसेच पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने कार्यरत राहून जनजागृती घडवून आणल्याबद्दल दिल्ली येथील अर्थ ग्लोबल संस्थेने डॉ.निलेश राणे यांची ग्रीन ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे.

पर्यावरण क्षेत्रात डॉ. राणे यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

### श्री. गो. से. हायस्कूलमध्ये डॉ.आंबेडकर जयंती साजरी

**पाचोरा ।** येथील श्री. गो. से. हायस्कूलमध्ये दि.१४ एप्रिल रोजी डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सर्वांनी विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक एन. आर. ठाकरे, उपमुख्याध्यापक आर. एल. पाटील, ए.आर. गोहिल, आर. बी. बांठिया, सांस्कृतिक विभाग प्रमुख आर. बी. बोरसे, क्रीडा प्रमुख एस. पी. करंदे, कार्यालयीन प्रमुख अजय सिनकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चोपड्यात हिंदू समाजाची भव्य रॅली

## पीआयवरील कारवाईबाबत वरिष्ठांकडून पाच दिवसांत निर्णयाचे आश्वासन





प्रतिनिधी । चोपडा

**शहर पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांच्यावर पाच दिवसात योग्य ती कारवाई करू; वरिष्ठांचे आश्वासन मिळाल्याने ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.**

**छत्रपती शिवाजी महाराज चौकात पीआय साळवे यांच्यावरील कारवाईची मागणी केल्यानंतर सर्व हिंदू संघटनांचे पदाधिकारी व गोरक्षकांनी महाराज चौकात ठिय्या मांडला. त्यानंतर पोलीस अधीक्षकांनी पुन्हा दूरध्वनीद्वारे पाच दिवसांत चौकशी करून त्वरित निर्णय घेण्याची ग्वाही दिली.**

चोपडा शहर पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांचे त्वरित निलंबन व्हावे, या मागणीसाठी काल चोपडा शहरात समस्त गोरक्षक व सकल हिंदू संघटनांच्या वतीने भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात हजारोंच्या संख्येने महिलांनी सहभाग घेतला. गोरक्षक व हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. श्रीराम मंदिरापासून सुरू झालेली ही रॅली मेन रोडमार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात आली. चौकात रोहित निकम, गजेंद्र जयस्वाल व संजय शर्मा यांनी उपस्थितांना संबोधित केले.

यावेळी वक्त्यांनी के.जी.एन. कॉलनीत सुरू असलेल्या कत्तलखान्यांवर व गोरक्षकांवर होत असलेल्या हल्ल्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली. तसेच पीआय मधुकर साळवे यांना त्वरित निलंबित करावे, अशी मागणी वरिष्ठांकडे करण्यात आली. यासंदर्भात रोहित निकम व संजय शर्मा यांनी पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी व मंत्री गिरीश महाजन यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी पाच दिवसांत चौकशी करून योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. संजय शर्मा यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात पीआय साळवे यांच्यावरील कारवाईची मागणी केल्यानंतर सर्व हिंदू संघटनांचे पदाधिकारी व गोरक्षकांनी महाराज चौकात ठिय्या मांडला. त्यानंतर पोलीस अधीक्षकांनी पुन्हा दूरध्वनीद्वारे पाच दिवसांत चौकशी करून त्वरित निर्णय घेण्याची ग्वाही दिली. पोलीस अधीक्षकांच्या आश्वासनानंतर वरिष्ठांचा मान ठेवून आंदोलकांनी रॅलीचे समापन केले. तहसीलदार व पोलीस उपविभागीय अधिकारी घोलप यांना निवेदन देऊन मोर्चा तात्पुरता स्थगित करण्यात आला.

# बाबासाहेब संपूर्ण देशाचे उध्दारकर्ते : किसन सूर्यवंशी

## म्हसदीत पंचशील मित्र मंडळातर्फे व्याख्यान



प्रतिनिधी । साक्री

**बाबासाहेब यांनी ओबीसी समाजासाठी किती मोठा त्याग केला तसेच आदिवासी बांधवांसाठी सुद्धा घटनेमध्ये तरतूद करून ठेवलेली आहश्र, अशा पद्धतीने बाबासाहेबांचा लढा हा संपूर्ण बहुजनासाठी होता आणि बाबासाहेब संपूर्ण देशाचे उद्धारकर्ते आहेत, असे प्रतिपादन विद्रोही वक्ते किसन सूर्यवंशी यांनी केले.**

म्हसदी येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने दि १३ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील विद्रोही वक्ते किसन सूर्यवंशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ,महात्मा ज्योतिराव फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले . बहुजनांचे बाबासाहेब व फुले शाहू आंबेडकरी चळवळ संविधानिक आव्हाने या विषयावर भाष्य करत असताना प्रमुख वक्ते म्हणून किसन सूर्यवंशी यांनी बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जाती जमाती अल्पसंख्यांक ओबीसी व मुस्लिम या समाजासाठी संविधानामध्ये कशा पद्धतीने तरतुदी करून ठेवलेले आहेत.

तसेच महात्मा ज्योतिराव फुले छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती शाहू महाराज व बाबासाहेब आंबेडकर या त्रिसूत्री चे वैचारिक नाते कशा पद्धतीने आहेत याचे अनेक इतिहासातील संदर्भ ,विविध घटना ,प्रसंग देऊन दीड तास या विषयावर जनतेला सखोल असं मार्गदर्शन केले. प्रस्ताविक किरण मोहिते यांनी केले तर आभार प्रदर्शन सूर्यवंशी यांनी मानले.

# फुले-आंबेडकरांनी पेरलेले विचार अंगिकारावे : प्राचार्य प्रा.डॉ.संध्या सोनवणे

प्रतिनिधी । चोपडा



**महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सवाची सांगता दि. १४ एप्रिल २०२६ रोजी दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात आली. कार्यक्रमाची सुरवात ११ वी कलाचा विद्यार्थी शिवम गुरव याने बासुरी वाजवून केली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य प्रा. डॉ. संध्या एम. सोनवणे, उपप्राचार्य डॉ. के. एन. सोनवणे, प्रमुख वक्ते प्रा. एल. एम. भुसारे, कनिष्ठ महाविद्यालयातील उपप्राचार्य पी. एस. पाडवी व पर्यवेक्षक ए. एन. बोरसे विचार मंचावर उपस्थित होते.**

विद्यार्थी मनोगतात विद्यार्थ्यांनी फुले व आंबेडकर यांच्या कार्यावर विविधांगी भाष्य केले. त्यांच्या कार्याचा उजाळा विद्यार्थी आपल्या भाषणातून देत होते. शिक्षक मनोगतात पर्यवेक्षक ए. एन. बोरसे यांनी आपले विचार व्यक्त करून महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक जीवन व शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रम प्रसंगी समन्वयक पी. एस. पाडवी यांनी कार्यक्रम साजरा करण्याचा उद्देश स्पष्ट केला. फुले व आंबेडकर यांचे कार्य समता व न्यायवादी असून त्याचा फायदा आजच्या पिढीला होत आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रमुख वक्ते यांनी फुले व आंबेडकर फक्त एका जाती पुरते मर्यादित नसून सर्वांसाठी त्यांनी कार्य केले आहे असे स्पष्ट केले. उपप्राचार्य डॉ. के. एन. सोनवणे यांनी फुलेंचे शेतीविषयक व आंबेडकरांचे संविधान विषयक मूल्य यावर आपले विचार व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयच्या प्राचार्य प्रा.डॉ.संध्या एम.सोनवणे यांनी महात्मा फुलेंचे विचार सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आदी घटकांमध्ये किती महत्वपूर्ण आहेत; असे आपल्या भाषणातून पटवून दिले. सर्वच समाजसुधारकांनी जे विचार पेरेलेले आहेत ते आंगीकारावे. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव प्रस्थापित होण्यासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न व्हावेत. जयंती नाचून नव्हे तर वाचून साजरी करायला हवी. फुले व आंबेडकरांनी महिला शिक्षणावर अधिक भर दिला आहे. फुलेंनी महिलांना शिक्षण दिले तर आंबेडकरांनी संविधानाद्वारे महिलांना स्वातंत्र्य बहाल केले. अशा विविध मुद्यांवर प्राचार्य सोनवणे यांनी माहिती दिली.

महाराष्ट्रातील समाजसुधारकांवर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. दि.११ एप्रिल २०२६ रोजी सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा घेण्यापूर्वी १० दिवस आधी महाराष्ट्रातील ५० समाजसुधारकांची पीडीएफ पुस्तिका विद्यार्थ्यांना देण्यात आली. ह्या पुस्तिकेच्या आधारे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक कौशल्य वाढावे, विविध स्पर्धांची माहिती व्हावी आणि सामाजिक क्षेत्रातील सर्वांगीण विकास व्हावा. तसेच विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी ह्या उद्देशाने स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे स्वरूप बहुपर्यायी प्रकारचे होते. एकूण प्रश्न ५० असून प्रत्येक प्रश्नाला २ मार्क होते. परीक्षेसाठी वेळ मर्यादा १ तासाची निश्चित करण्यात आली. स्वतंत्र प्रश्नपत्रिका व स्वतंत्र उत्तर पत्रिका देण्यात आली. अशी १०० गुणांची परीक्षा घेण्यात आली. ह्या परीक्षेत महाविद्यालयातील एकूण २१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ह्या स्पर्धेत शिवम अनंत गुरव प्रथम, शिवराज संतोष भोई-द्वितीय, अश्विनी महेंद्र कोळी व शेख फैजल शेख हाफीज तृतीय क्रमांकाने गौरवण्यात आले. ७ विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणिज्य विभागातील विद्यार्थिनी सायली कुंभार हिने केले. सदर कार्यक्रमास कनिष्ठ विभागातील कला व वाणिज्य विभागातील सर्व शिक्षकवृंद यांचे अनमोल सहकार्य लाभले. कार्यक्रमास शिक्षकेतर कर्मचारी यांचेदेखील सहकार्य लाभले. इयत्ता ११ वी वर्गाची विद्यार्थिनी कु. भाग्यश्री कोळी हिने कार्यक्रमाच्या उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एस. टी. शिंदे, संदीप पाटील, प्रमोद. आर. पाटील, भूषण बिरारी, संदीप देवरे, व्ही.डी. शिंदे, दीपक करणकाळ, निवृत्ती पाटील, श्रीमती. अनीता सांगोरे , बाबासाहेब जाधव, दिनेश अलाम इत्यादि शिक्षकांनी सहकार्य केले व परिश्रम घेतले.

## मुक्ताईनगर शेतकी संघात हरभरा खरेदी सुरू

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

येथील शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघाच्या गोदामात दि.१३ एप्रिल रोजी नाफेड अंतर्गत हरभरा खरेदी केंद्राचा शुभारंभ झाला. शेतकी संघाचे सभापती दत्तू किसन पाटील यांच्या हस्ते प्रथम आलेले शेतकरी उल्हास जावळे यांचा हरभरा मोजून केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. प्रतिक्विंटल ५८७५ रुपये भाव दिला जात आहे. दि.१५ एप्रिलपर्यंत २० शेतकऱ्यांनी हरभरा खरेदीची ऑनलाईन नोंद केली असून आज अखेर पाच शेतकऱ्यांनी १३३६ किंटल ५० किलो हरभरा विक्री केलेला आहे. हरभरा खरेदी केंद्र उद्घाटन प्रसंगी शेतकी संघाचे उपसभापती मधुकर गोसावी. संचालक प्रभाकर झोपे, व्यवस्थापक रमेश निकम, कर्मचारी राजू पाटील, विनोद माळी, ऑपरेटर सचिन भंगाळे, संचालक मंडळ, कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते.

# हिंदूंनी आपल्या संस्कृतीचा, ग्रंथांचा अभ्यास करावा : आशिष भारतवंशी

प्रतिनिधी । चोपडा



हिंदू समाजाने आपली पौराणिक संस्कृती अभ्यासली पाहिजे. हिंदू धर्माला हजारो वर्षांचा इतिहास आहे.संतांची मोठी परंपरा आहे. या सर्वांचा आपला अभ्यास गरजेचा आहे. आपण वेगवेगळ्या आक्रमणांमुळे गुलामगिरीची मानसिकता अद्यापही धरून बसलो आहोत. तीला बदलवून छत्रपती शिवाजी महाराज, गौतम बौध्द, विवेकानंद, झाशीची राणी, अहिल्यादेवी यांच्या समाजाप्रती दिलेल्या योगदानाचा अभ्यास केला पाहिजे. आपण परिपूर्ण असू तर कोणत्याही परधर्मियाची ताकद नाही. आपल्यावर चाल करण्याची,परंतु आपण जाती-जातीत दुभंगलो आहोत. त्यामुळे सर्व कवच कुंडले गुंडाळून हिंदू म्हणून एकत्र येण्याचे आवाहन आशिष भारतवंशी (नागपूर) यांनी येथे केले.

शहरातील साने गुरुजी वसाहत वस्तीतील हिंदू रहिवाश्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दि वर्षाच्या निमित्ताने आयोजित हिंदू संमेलनात भारतवंशी बोलत होते. यावेळी मंचावर ह.भ.प.सुशील महाराज विटनेरकर,प.पु.बाबा महाहंसजी महाराज (मनुदेवी) उपस्थित होते.

यावेळी अजय सुर्यवंशी (शेंदुर्णी) म्हणाले की, जगातील सर्वात मोठे संघटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दि निमित्ताने हिंदू संमेलन हा एकजूटीचा मंत्र आहे.

# नॅशनल असोसिएशन ऑफ फिशरमॅन संस्थेच्या उत्तर महाराष्ट्र सचिवपदी संजीव शिरसाठ

प्रतिनिधी । चोपडा

**संपूर्ण महाराष्ट्रातील कोळी जमात बांधवांच्या सहकार्याने नॅशनल असोसिएशन ऑफ फिशरमॅन या राष्ट्रीय संस्थेची बैठक कार्याध्यक्ष गणेश वैती यांच्या येऊर एअरफोर्स, हिल्स, शुभारंभ लॉन संपन्न होऊन संस्थेच्या उत्तर महाराष्ट्र सचिवपदी संजीव पांडुरंग शिरसाठ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.तसें नियुक्त पत्र राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार शिवडीकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले आहे.**




या प्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार शिवडीकर यांनी मत्स्यव्यवसाय आणि जलशेती केंद्रीय योजना विषयी मार्गदर्शन केले.तसेच नवनियुक्त पदाधिकारी यांना मार्गदर्शनपर शासनाचे तंत्रज्ञान, योजना या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी साठी पुढील दिशा निश्चित करण्याचा उद्देशाने नॅशनल असोसिएशन ऑफ फिशरमॅनच्या कार्यकर्त्यांनी तळागाळातील समाजासाठी योजना पोहचवाव्यात त्याचबरोबर विकसित देशांतील प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तरुण मच्छीमारांचा विकास करणे हे ध्येय कार्यकार्त्यांनी ठेवले पाहिजे असे स्पष्ट केले. कार्यक्रम प्रसंगी नॅशनल असोसिएशन ऑफ फिशरमन या आंतरराष्ट्रीय संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार शिवडीकर, राज्यध्यक्ष साईनाथ तारे, उपाध्यक्ष सखाराम बिऱ्हाडे , राज्य सचिव महेंद्र चौगुले , कोकणचे प्रमुख भूपेंद्र गवते ,कार्यकारी अध्यक्ष गणेश वैती,उत्तर महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र सावळे,धुळे जिल्हाध्यक्ष प्रदीप सैंदाणे, जळगाव जिल्हाध्यक्ष गोपीचंद बाविस्कर, सौ.मानिनी वरळीकर, सौ.छाया भानजी म हेमांगी कोळी तसेच महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थितीत होते.प्रसंगी संजीव शिरसाठ यांचेसह निवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले .

# कृउबा समितीत शेतीमाल विक्रीसाठी वाहने थेट येऊ द्या

## रयतसेनेने बाजार समिती सभापतींना केली निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी । चाळीसगाव



**निवेदनावर आबासाहेब गरुड, गोविंद वाघ, गोकुळ पाटील, प्रदीप मराठे, शवाजी गवळी, भरत नवले, मुकुंद पवार, संघटक दीपक देशमुख, सुधीर पाटील, ज्ञानेश्वर सोनार, गणेश देशमुख यांच्यासह शेतकरी धनराज पवार, भोलेनाथ पवार, वसंत पाटील, देवेंद्र बोरसे, किरण आहेर, शिवाजी मरेकर, मच्छिंद्र पवार, पवन राठोड , लखम राठोड, लक्ष्मण पवार, भगवान राठोड, कांतीलाल राठोड यांच्यासह रयत सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीने काही दिवसांपासून नवीन नियम लागू केला आहे. त्यात शेतकऱ्यांनी आणलेले शेतमालाची वाहने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य गेट बाहेर उभे करून नंबर प्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समितीत घेतले जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांना वाहनांचे भाडे जास्तीचे द्यावे लागत असल्याने आर्थिक फटका बसत आहे. यावर अनेक शेतकऱ्यांनी रोष व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांचे वाहने मार्केटमध्ये घेऊन धान्य खरेदी करण्याची मागणी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती प्रदीप पाटील यांना दि १५ रोजी रयत सेनेने निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात म्हटले आहे की, चाळीसगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने नवीन नियम लागू करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी आणलेल्या वाहनातून धान्य आडत दुकानासमोर उभारून खाली करून वाहने निघून जात होती. आता मात्र बाजार समितीच्या बाहेर भर रोडावर वाहने उभी केली जात आहे. यामुळे शेतकरी अडकून पडत आहे. त्यांना दुसरे कुठलेच कामे करता येत नाही. वाहनांचे भाडे जास्तीचे द्यावे लागत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचे काम बाजार समितीचे सभापती व प्रशासन करीत आहे. तसेच सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे धान्य विक्रीसाठी आणलेली वाहने घाट रोडवर तासन्तास उभी करावी लागत आहेत. शेतकरी उन्हाच्या तीव्रतेने कमालीचा त्रस्त झाला असून सभापती, उपसभापती व प्रशासनाने शेतकऱ्यांचे धान्य ज्वारी, मका. बाजरी. गहू व इतर धान्य भरून आणलेले वाहने गेट बाहेर उभी न करता, तत्काळ खाली करून द्यावी, अशी मागणी आहे.

# जामनेरात भारतीय जैन संघटनेची व्यापारी सक्षमीकरण कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी । जामनेर

**येथील व्यापाऱ्यांना उद्योग-व्यवसायात अधिक सक्षम बनविण्यासाठी भारतीय जैन संघटना व व्यापारी एसोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने येथील महावीर भवनमध्ये आयोजित विशेष कार्यशाळा उत्साहात पार पडली.**

खान्देशात तळोदा, शहादा, शिरपूर, धुळे, शिंदखेडा, पाचोरा, जळगाव या सात ठिकाणी कार्यशाळा होऊन जामनेर येथील ही आठवी कार्यशाळा असून, राज्य अध्यक्ष केतन शहा, राज्य महासचिव प्रवीण पारख यांच्या मार्गदर्शनाने व उपाध्यक्ष विनय पारख, खान्देश विभाग अध्यक्ष प्रा. चंद्रकांत डागा यांच्या प्रयत्नाने केले गेले असल्याचे विभाग उपाध्यक्ष सुमित मुनोत यांनी सांगितले. कार्यशाळेत उद्योजकतेसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सखोल माहिती देण्यात आली. कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून निरंजन जैन यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी उद्योग-व्यवसायासाठी उपलब्ध शासकीय योजनांची माहिती, त्या योजनांचा लाभघेण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया तसेच कर्जासाठी लागणारी सिक्युरिटी (हमी) याबाबत सविस्तर विवेचन केले.